उमेदवारांना क्रिमी-लेअरमध्ये गणले जातात किंवा नाही याबाबत प्रमाणपत्र देण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. क्रिमी-लेअर बाबतचे निकष या विभागाच्या वर नमूद केलेल्या दिनांक १६ जून, १९९४ च्या शासन निर्णयामध्ये स्पष्ट केलेले आहेत. इतर मागासवर्गीयांना [भटक्या जमाती [क] व भटक्या जमाती [ड] सह] जातीची प्रमाणपत्रे देण्याबाबतचा विहित नमुना [विवरणपत्र "अ"] सोबत जोडला आहे. तसेच सक्षम अधिकाऱ्यांना उमेदवारांची जात क्रिमी-लेअरमध्ये येते किंवा नाही हे ठरविण्यासाठी उमेदवारांनी द्यावयाच्या अर्जाचा नमुना सोबत [विवरणपत्र "ब"] जोडला आहे.

सर्व सक्षम अधिकाऱ्यांना असे स्पष्ट करण्यात येते की, त्यांनी वरील सूचना लक्षात घेऊन शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करून इतर मागासवर्गीयांना [भटक्या जमाती [क] व भटक्या जमाती [ड] सह] क्रिमी-लेअर व जातीची प्रमाणपत्रे द्यावीत. जे सक्षम अधिकारी शासनाच्या आदेशाचा भंग करून जातीची प्रमाणपत्रे देण्यास जबाबदार ठरतील असे सक्षम अधिकारी दिनांक ५ डिसेंबर १९८५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

सही/- xxx

[संदिप बागची]

सचिव, महाराष्ट्र शासन.